# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक ०४.०७.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक २० :-** जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण २०२१-२२ पुर्नविनियोजन अंतर्गत प्राप्त निधी व सन २०२२-२३ मधील मंजुर नियतव्यय शिर्षनिहाय विकास कामाची निवड निश्चिती करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यासाठी सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक २० :-** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात पुर्नविनियोजन अंतर्गत खालीलप्रमाणे निधी प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त निधी मधून मा. आयुक्त, महानगरपालिका अमरावती यांनी खालील कामांना मंजुरी प्रदान केलेली आहे.

| अ. क्र. | विकास शिर्ष/उपशिर्ष/ योजनेचे नांव | मंजुर अर्थसंकल्पीय तरतुद | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र नगरोस्थान महा अभियान साठी नगर पालिका/ महानगरपालिकांना अनुदाने (निधी वितरण आदेश क्र. जिनिस/ O/ २०२२/Mar/FRO/०५०९६; दिनांक ३०.०३.२०२२) | १०० लक्ष | अमरावती महानगरपालिका क्षेत्रा अंतर्गत भुयारी गटार साफ सफाई करण्याकरिता ३ जेटिंग मशीन विकत घेण्याकरीता निधी मिळण्या बाबत | १,४७,००,०००/- |
| २ | विकास योजना राबविण्यासाठी महानगरपालिकांना सहाय्यक अनुदान (कार्यक्रम) (निधी वितरण आदेश क्र. जिनिस/O/२०२२/Mar/FRO/ ०५०९४;दिनांक ०.०३.२०२२) | २०० लक्ष | प्र.क्र.१ शेगाव-रहाटगाव येथील अर्जुन नगर परिसर अंतर्गत टेलिफोन येथे खुल्या जागेमध्ये वाचनालयाचे बांधकाम करणे | १७,६९,२०६/- |

१. वरील तक्त्यामध्ये अ.क्र.१ मध्ये नमुद केलेल्या शिर्षा अंतर्गत अंदाजपत्रकीय किंमत रुपये १,४७,००,०००/- चे काम प्रस्तावित आहे. पुर्नविनियोजन मध्ये रुपये १.०० कोटी प्राप्त झाले. उर्वरित रुपये ४७,००,०००/- ची तरतुद सन २०२२-२३ मध्ये या शिर्षा अंतर्गत मंजुर केलेल्या नियतव्यय मधुन देण्यात येईल.

२. वरील तक्त्यामध्ये अ.क्र.२ मध्ये नमुद केलेल्या शिर्षा अंतर्गत अंदाजपत्रकीय किंमत रुपये १७,६९,२०६/- चे काम प्रस्तावित आहे.

उर्वरित सन २०२१-२२ व सन २०२२-२३ मध्ये जिल्हा नियोजन कडुन प्राप्त होणाऱ्या नियतव्यय नुसार शिर्ष निहाय कामाची निवड निश्चिती करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यासाठी विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

स्वा/-
नगरसचिव,
महानगरपालिका,अमरावती

स्वा/-
प्रशासक,
महानगरपालिका,अमरावती

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.